ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 12 | ISSUE - 1 | SEPTEMBER - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# सोलापूर जिल्ह्यातील पर्यटन : एक अभ्यास




**महेश साखरे**
**संशोधक विद्यार्थी**
**दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय सोलापूर.**

## प्रस्तावना :

पर्यटनाला इंग्रजीत " Tourism" असे म्हटले जाते. "Tourism" हा शब्द "Tour" या शब्दापासून व " Tour" हा शब्द लाटिन भाषेतील " Tornos" या शब्दापासून तयार झालेले आहे. Tourism या शब्दाचा अर्थ "Journey" प्रवास असा होतो. म्हणजेच एखाद्या अपरिचित अथवा परिचित जागेचा शोध घेणे, अभ्यास करणे, शिक्षण घेणे इत्यादीसाठी जो प्रवास केला जातो त्याला पर्यटन असे संबोधले जाते. पर्यटन हा शब्द "अट" या संस्कृत धातूपासून बनलेला असून त्याचा अर्थ भ्रमती करणे असा होतो. जागतिक पर्यटन संस्थेच्या अनुसार, "पर्यटन ही एक सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक क्रिया आहे ज्यामध्ये वैयक्तिक किंवा व्यावसायिक हेतूसाठी लोकांच्या नेहमीच्या वातावरणाच्या बाहेर देश किंवा ठिकाणी जाणे समाविष्ट आहे." या लोकांना अभ्यागत पर्यटक असेही संबोधले जाते. पर्यटनाचा संबंध पर्यटकांच्या क्रिया कलापांशी असतो ज्यात काही पर्यटनाच्या संबंधित घटकांचा समावेश असतो. पर्यटन हा विविध घटकांचा संयुक्त अविष्कार आहे. पर्यटनात भौगोलिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक इत्यादी घटकांचा समावेश होतो.

## शोधनिबंधाचा उद्देश :

1. सोलापूर जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचा अभ्यास करणे.
2. सोलापूर जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचा आढावा घेणे.
3. सोलापूर जिल्ह्यातील पर्यटनाच्या दृष्टिकोनातून दुर्लक्षित राहिलेल्या स्थळांची माहिती घेणे.
4. पर्यटनाच्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या मूलभूत सुविधांचा अभ्यास करणे.

## गृहीतके :

1. सोलापूर जिल्हा हा पर्यटनाच्या दृष्टिकोनातून समृद्ध असा आहे.

2. सोलापूर जिल्हा हा ऐतिहासिक धार्मिक आरोग्यविषयक पर्यटनासाठी महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे.
3. सोलापूर जिल्ह्याचा पर्यटनाच्या दृष्टिकोनातून विकास होण्यासाठी अनेक संधी उपलब्ध आहेत.

**अभ्यास पद्धती :**

सोलापूर जिल्ह्यातील पर्यटन हा प्रस्तुत संशोधन लेख दुय्यम संदर्भ साधनांवर आधारित असून विविध मासिके, सोलापूर जिल्हा गझेटर्स, संशोधन, इंटरनेट, संदर्भ ग्रंथ इत्यादीचा आधार घेतला गेला आहे.

**सोलापूर जिल्ह्याचे भौगोलिक स्थान :**

सोलापूर हे महाराष्ट्रातील एक प्रमुख जिल्हा असून तो महाराष्ट्राच्या "पश्चिम महाराष्ट्र" या प्रादेशिक विभागात येतो. भौगोलिकदृष्ट्या सोलापूर जिल्हा 17' अंश 10' आणि 18' अंश 32' उत्तर अक्षांश आणि 74' अंश 42' व 76' अंश 15' पूर्व रेखांशावर वसलेला आहे. जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ 14,844.6 चौरस किलोमीटर इतके आहे. 2011 च्या जनगणनेनुसार सोलापूर जिल्ह्याचे एकूण लोकसंख्या 43 लाख 15 हजार 527 इतकी आहे. सोलापूर जिल्ह्यात एकूण 11 तालुके आहेत. भीमा नदी ही सोलापूर जिल्ह्यातील एक प्रमुख नदी आहे. सोलापूर जिल्ह्याच्या उत्तरेस अहमदनगर, उस्मानाबाद, पूर्वेस उस्मानाबाद, दक्षिणेस कर्नाटकातील विजापूर जिल्हा आहे. जिल्ह्याचे हवामान सर्वसाधारणपणे उष्ण व कोरडे स्वरूपाचे आहे.

**सोलापूर जिल्ह्यातील काही प्रमुख पर्यटन स्थळे :**

**1. सोलापूर शहरः**

सोलापूर शहराला ऐतिहासिक वारसा लाभल्याचे आपणास दिसते. विशेषतः सोलापूर शहरातील सिद्धरामेश्वर मंदिर प्रसिद्ध आहे. मंदिराच्या चारही बाजूंनी ते पाण्याने वेढलेले आहे. या मंदिरास भारतातील "दुसरे सुवर्ण मंदिर" या नावाने ही संबोधले जाते. मंदिराच्या उत्तरेस सोलापूरचा भुईकोट किल्ला आहे. हा किल्ला सुमारे आठशे वर्षे जुना आहे. इसवी सन 1398 मध्ये बहामनी वजीर महंमद गवान याने या किल्ल्याच्या बांधकामात सुरुवात केल्याचे ऐतिहासिक दस्तऐवजातून दिसून येते. याशिवाय रेवणसिद्धेश्वर मंदिर, रुपाभवानी मंदिर, गणपती घाटाजवळील गणेश मंदिर, चौपाड येथील विठ्ठल मंदिर, दत्त चौकातील दत्त मंदिर, शुभराय महाराजांचा मठ याबरोबरच या शहरात ब्रिटिश काळाची साक्ष देणारे अनेक ऐतिहासिक वास्तू उभ्या आहेत. उदाहरणार्थ शहरातील कापड गिरणी- जुनी मिल, नरसिंग गिरजी मिल, रिपन हॉल, चार हुतात्मा पुतळा, सोलापूर नगरपालिकेची जुनी इमारत, चौपाड मधील जुने वाडे, सोलापूर महानगरपालिकेची भव्य इमारत, भागवत टाकीझ, मेकॅनिकी चौक, D.A.V. शिक्षण संस्था, नवी दिल्ली यांच्याशी संबंधित असणारी दयानंद कॉलेजची भव्य ब्रिटिश कालीन वास्तू इ. सोलापूर शहरातील या ऐतिहासिक वारशांचा आढावा घेतल्यास यात आपणास प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक काळ विशेषतः ब्रिटिश काळाचे मिश्रण झाल्याचे आपणास दिसून येते.

**2. पंढरपूर :**

भारताचे "दक्षिणकाशी" म्हणून पंढरपुरास ओळखले जाते. संपूर्ण महाराष्ट्राचे आराध्य दैवत असणारे श्री विठ्ठल रुक्मिणी हे पंढरपुरात विराजमान आहेत. वारकरी संप्रदायातील अभंगांमध्ये **"पृथ्वीतलावरील भूवैकुंठ"** म्हणून पंढरपुरास संबोधले गेले आहे. पंढरपूर हे भीमा नदीच्या काठावर वसलेले आहे. पंढरपूरच्या प्रसिद्ध आषाढीवारीस देशाच्या व महाराष्ट्राच्या विविध कानाकोपऱ्यातून भावीक उपस्थित राहतात. याशिवाय पंढरपुरात विशेषतः लहान-मोठी तीस मंदिरे आहेत. प्रसिद्ध दर्शनीय असा कैकाडी महाराजांचा मठ, तनपुरे महाराज मठ, शेगावचे गजानन महाराज मठ, गोपाळपूर इत्यादी प्रेक्षणीय येथे स्थळे आहेत.

**3. अक्कलकोट :**

आज भारतात गुरुपरंपरेला महत्त्वपूर्ण स्थान आहे. संस्कारपूर्ण रीती - रिवाजाला अनुसरूनच आज महाराष्ट्रात तीन गुरूस्थानांना विशेष महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त आहे. एक शेगावचे गजानन महाराज, दोन शिर्डीचे साईबाबा, तीन अक्कलकोटचे स्वामी समर्थ महाराज. सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोटचे स्वामी समर्थ महाराज यांना श्री दत्तात्रेय यांचा अवतार म्हणून ते विशेष ख्यातीपूर्ण ठरतात. दरवर्षी गुरुपौर्णिमेस हजारो स्वामीभक्त अक्कलकोटला येतात.व स्वामीचरणी नतमस्तक होतात. महाराष्ट्राच्या प्रत्येक भागातून विशेषतः कोकणातून सर्वात जास्त भाविक अक्कलकोट येथे येतात व स्वामी दर्शन घेतात. तसेच अक्कलकोट पासून जवळच असणाऱ्या श्री.दत्तक्षेत्र गाणगापूर, जि.कलबुर्गी,राज्य-कर्नाटक भेट देतात. अक्कलकोट येथे स्वामी समर्थ मंदिराशिवाय भोसले यांचा राजवाडा, शस्त्रास्त्र वस्तुसंग्रहालय पर्यटकांच्या  आकर्षणाचे केंद्रबिंदू आहे. भक्त व यात्री निवासस्थान येथे उपलब्ध आहे.

याशिवाय अक्कलकोट शहरापासून जवळपास 11 कि.मी. असणारे गौडगाव (बुद्रुक) येथील जागृत मारुतीचे  मंदिर प्रसिद्ध आहे. नवसाला पावणारा मारुती म्हणून या मंदिराची प्रसिद्धी आहे. मंदिरातील मारुतीची मूर्ती हि दक्षिणाभिमुख असून, असे म्हटले जाते कि या मारुतीची स्थापना समर्थ रामदासांनी केलेली आहे. दरवर्षी हनुमान जयंतीच्या निमित्ताने हजारो भाविक महाराष्ट्राच्या तसेच कर्नाटकाच्या विविध भागातून या मंदिरातील मारुतीच्या दर्शनासाठी येतात. विशेषत: अक्कलकोट रोड स्टेशन हे मुंबई-चेन्नई, मुंबई-हैदराबाद आणि नवीदिल्ली-बेंगलोर (मध्य रेल्वे) या रेल्वे मार्गावर वसले असल्या कारणाने देखील सहजरीत्या उत्तर व दक्षिण भारतातील पर्यटक भाविक मारुतीच्या दर्शनासाठी येवू शकतात. येथील मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी अन्नछत्रालयाची तसेच निवासस्थानाची देखील सोय मंदिर समितीच्या वतीने करण्यात आलेली आहे.

**4. बार्शी :**

सोलापूर जिल्ह्यातील एक महत्त्वपूर्ण तालुका म्हणून बार्शी ओळखले जाते. "मराठवाड्याचे प्रवेशद्वार" म्हणून या तालुक्याची ओळख आहे. येथील श्री भगवंताचे मंदिर पर्यटकांच्या दृष्टीने प्रसिद्ध आहे मंदिराच्या हेमाडपंथी स्थापत्यशैलीमुळे बार्शीला भगवंताची बार्शी असे म्हणतात. एकादशीस पंढरपुरात विठोबाचे दर्शन घेणारा वारकरी दूवादशीला बार्शीच्या भगवंताचे दर्शन घेतल्याशिवाय परत आपल्या गावी जात नाही इतके या मंदिराचे महत्व आहे. बार्शीतील व्यापारी पेठ, एनटीसी

ची कापड गिरणी, नर्गीस दत्त मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटल, श्री.शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळी संस्था, रामलिंग, कुंतलगिरी इत्यादी बार्शी तालुक्यातील विशेष आकर्षणाची केंद्रे आहेत.

**5. करमाळा :**

प्रसिद्ध पेशवेकालीन मराठा सरदार रावरंभा निंबाळकर यांची जहागीर म्हणून करमाळा ओळखला जातो. करमाळा हा सोलापूर जिल्ह्यातील एक मुख्य तालुका आहे. हा तालुका अहमदनगर जिल्ह्याच्या सीमेवर वसला आहे. रावरंभा निंबाळकर यांची कुलदैवता म्हणून त्यांनी येथे कमलाई देवीचे मंदिर बांधले. या मंदिराचे प्रवेशद्वार हे गोपुराच्या शैलीत अर्थातच द्राविडी शैलीमध्ये बांधले गेल्याचे दिसून येते. संपूर्ण महाराष्ट्राला वेड लावणाऱ्या **सैराट** या मराठी चित्रपटामुळे हे गाव प्रसिद्धीस आले आहे. येथील मंदिरे, निसर्ग सौंदर्य, उजनी धरणाचा पानवठा, मंदिरातील अष्टकोनी विहीर, रावरंभा निंबाळकरांची गढी इत्यादी आज पर्याटकांच्या विशेष आकर्षणाचे केंद्रबिंदू आहेत.

**6. अकलूज :**

सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यात अकलूज हे प्रसिद्ध पर्यटन केंद्र आहे. विशेषतः अकलूज मध्ये वॉटर पार्क, शिवामृत डेअरी, अकलूजचा किल्ला, किल्ल्यातील साकारलेली शिवसृष्टी, इत्यादी पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्रबिंदू आहेत. दरवर्षी दिवाळी व उन्हाळी सुट्टीत पर्यटक येथील पर्यटन स्थळांना भेट देतात.

**7. द.सोलापूर :**

सोलापूर शहरापासून जवळपास 20 ते 25 किलोमीटर अंतरावर दक्षिण सोलापूर तालुका वसला आहे. मंद्रूप हे या तालुक्यातील महत्त्वपूर्ण गाव. दक्षिण सोलापूर तालुका हा मुख्यत्वे कर्नाटक राज्याच्या सीमेवर वसलेला आहे. त्यामुळे या तालुक्यातील लोकांवर कानडी भाषा, खाद्य संस्कृती इत्यादीचा प्रभाव जाणवतो. कन्नड भाषिकांची लोकसंख्या येथे भरपूर आहे. या तालुक्यातील भीमा सीना नदीच्या काठावर हत्तरसंग कुडल हे प्रसिद्ध मंदिर वसले आहे. या मंदिराचे उत्खनन सोलापुरातील द.भै.फ.दयानंद कला व शास्त्र महाविद्यालयातील प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृती विभागाचे विभागप्रमुख कै.प्रा.गजानन भिडे सर यांनी केले.व या मंदिराच्या इतिहासाचा आढावा त्यांनी घेतला. येथील हरिहरेश्वर मंदिर विशेष कला-कौशल्याने युक्त आहे. येथील मंदिरात असणारा 359 मुखी शिवलिंग प्रसिद्ध आहे. हे मंदिर चालुक्य कालखंडाशी अर्थातच इसवी सनाच्या नवव्या व दहाव्या शतकाशी संबंधित असून मंदिराची रचना शैली ही चालुक्यकालीन आहे. दरवर्षी येथे श्रावण महिना व महाशिवरात्रीस महाराष्ट्रातील व शेजारच्या कर्नाटकातील हजारो भाविक हजर राहतात. या मंदिराचे जतन व संवर्धन करण्याचे काम महाराष्ट्र राज्य पुरातत्व संचलनालय मार्फत होत आहे.

**8. मंगळवेढा :**

"संतांची भूमी" म्हणून मंगळवेढा तालुक्यास ओळखले जाते. मंगळवेढा तालुका देखील कर्नाटक राज्य व महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्याच्या सीमेवर असला आहे. संत दामाजी पंतांची नगरी म्हणून मंगळवेढ्याची ख्याती संपूर्ण

महाराष्ट्रात आहे. त्याशिवाय **"महाराष्ट्राचे ज्वारीचे कोठार"** म्हणूनही मंगळवेढ्यास ओळखले जाते. मंगळवेढ्यातील तीर्थक्षेत्रांचा आढावा घेतल्यास मंगळवेढ्यात श्री तीर्थक्षेत्र माचनूर येथील भीमा सीना नदी तीरावर वसलेले सिद्धरामेश्वर मंदिर प्रसिद्ध आहे. श्रावण मासास व महाशिवरात्रीस येथे अनेक भक्त दर्शनास येतात.

### 9. मोहोळ :

मोहोळ येथील वडवळ येथे असणारे नागनाथाचे मंदिर प्रसिद्ध आहे. दरवर्षी नागपंचमीस मंदिराची यात्रा भरते. या यात्रेस सोलापूर जिल्हा व आजूबाजूच्या परिसरातील भाविक येथे दर्शनास येतात. याशिवाय मोहोळ मधील गढी प्रसिद्ध आहे.

## सोलापूर जिल्ह्यातील दुर्लक्षित पर्यटन स्थळे :

सोलापूर जिल्हयातील पर्यटनाच्या विकासाचा आढावा घेतला असता असे दिसते कि, येथील पर्यटनाचा विकास हा असमतोल रूपाने झालेला आहे. प्रामुख्याने बार्शी, दक्षिण सोलापूर, सोलापूर शहर, पंढरपूर येथे पर्यटनाच्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या सोयी-सुविधा निर्माण झालेल्या आहेत. जसे- रस्ते, धर्मशाळा, हॉटेल्स, रेल्वे,पर्यटन संस्था,पर्यटक मार्गदर्शक इ. तर दुसऱ्या बाजूस करमाळा, मोहोळ, मंगळवेढा इ. ठिकाणी अनेक पर्यटन स्थळे असून देखील पायाभूत सोयी-सुविधा नसल्यामुळे अनेक पर्यटकांना येथे जाता येत नाही. त्यामुळे आज सोलापूर जिल्ह्यातील संत दामाजी,संत कान्होपात्रा, संत चोखामेळा, नारायण चिंचोली, अर्धनारी नटेश्वर मंदिर, माचणुर, संत सावतामळी मंदिर, माढेश्वरी देवीचे मंदिर, नागनाथाचे मंदिर इ. स्थळांचा पर्यटनाच्या दृष्टीकोनातून विकास झालेला दिसून येत नाही.

वरील पर्यटन स्थळांचा विकास करावयाचा असेल तर त्यासाठी केंद्र सरकार,राज्य सरकार,पर्यटन विभाग, जिल्हा प्रशासन व स्थानिक प्रशासन यांनी एकमेकांच्या सहकार्याने,समन्वयाने कार्य करणे गरजेचे आहे. जेणे करून या पर्यटन स्थळांचा, लोकांचा, परिसराचा विकास होऊ शकेल.

## पर्यटनाच्या विकासाकरिता आवश्यक असणाऱ्या सोयी सुविधा :

सोलापूर जिल्ह्यातील पर्यटन: एक अभ्यास या संशोधन पेपरचा आढावा घेत असता मला असे दिसले की सोलापूर जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचा जो विकास झालेला आहे त्यात असमानता दिसून येते. विशेषतः पंढरपूर, अकलूज, अक्कलकोट, द.सोलापूर, बार्शी इत्यादी स्थळांचा विकास हा झालेला आहे परंतु दुसऱ्या बाजूस मंगळवेढा, कुर्डुवाडी, मोहोळ, करमाळा इत्यादी ठिकाणी असणाऱ्या पर्यटन स्थळांचा विकास होणे अद्यापही गरजेचे आहे. पर्यटन स्थळांचा विकास होण्याकरिता पर्यटनाच्या अनेक मूलभूत घटकांपैकी वाहतूक व निवासव्यवस्था हे दोन महत्त्वाचे घटक आहेत. यासोबतच रस्ते, हवाई वाहतूक, धर्मशाळा, लॉज, पंचतारांकित हॉटेल्स इत्यादींची गरज आज सोलापूर जिल्ह्यातील पर्यटन स्थळांना आहे. वरील प्रकारच्या मूलभूत सोयी सुविधा जर सोलापूर जिल्ह्यात उपलब्ध असेल तरच सोलापूर जिल्ह्याचा पर्यटनाच्या दृष्टिकोनातून संपूर्ण विकास होऊ शकतो. शिवाय पर्यटनाच्या विकासाकरिता जाहिरात किंवा मार्केटिंगची गरज आहे. ती गरज सोलापूर जिल्ह्यातील स्थानिक शासन यंत्रणेच्या माध्यमातून पूर्ण करता येऊ शकते.

**पर्यटन विकासाचे महत्त्व :**

पर्यटन हा एक किफायतशीर उद्योग आहे. त्यामुळे केंद्र सरकार अथवा राज्य सरकार किंवा स्थानिक शासन यंत्रणेने पर्यटनाच्या विकासाला महत्त्व दिले पाहिजे. पर्यटनाच्या विकासावरच स्थानिक परिसराचे, लोक समुदायाचे विकास अवलंबून असते. आज सोलापूर जिल्ह्यात अनेक ऐतिहासिक, धार्मिक पर्यटन स्थळे अस्तित्वात आहेत. या पर्यटन स्थळांचा विकास केल्यामुळेच त्यास पूरक असलेले उद्योगधंदे, व्यवसाय इत्यादींचाही विकास होतो. आज 21 व्या शतकातील जागतिकीकरणाचा विचार करता संपूर्ण जग हे एकमेकांच्या जवळ आलेले आहे आणि अशा या एकंदरीत परिस्थितीत देशात आणि महाराष्ट्रात पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांची संख्या देखील वाढत असल्याने पर्यटन क्षेत्रांचा विकास करणे आणि पर्यटन स्थळांच्या ठिकाणी पर्यटकांसाठी निरनिराळ्या सोयी सुविधा उपलब्ध करून देणे हे क्रमप्राप्त ठरते.

**संदर्भ ग्रंथ सूची**


1. महाराष्ट्र शासन, सोलापूर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, 2014
2. कठारे अनिल,साखरे विजया, पुरातत्वविद्या,वस्तुसंग्रहालयशास्त्र आणि पर्यटन,विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद, 2015
3. साखरे विजया,ऐतिहासिक पर्यटन,अक्षरलेण प्रकाशन,सोलापूर,2012
4. महाराष्ट्र शासन, सोलापूर जिल्हा गझेटीअर,आवृत्ती पहिली,1977
5. Kulkarni M.V., Tourism Marketing, Everest Publication, Pune,2005
6. https:// Solapur.gov.in.
7. https:// mr.m.wikipedia.org
8. www.maharashtratourism.gov.in.